आर.टी.ई.२५ टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती दर निश्चिती व प्रतिपूर्ती अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : आरटीई-२०१८/प्र.क्र.२४५/एस.डी.-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९

<u>शासन परिपत्रक:-</u>

शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत ज्या शाळांनी २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेले आहेत या शाळांच्या सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) आरटीई २५ टक्के प्रवेशाच्या प्रतिपूर्तीच्या रकमा संबंधित शाळांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीनंतर वितरित करण्यात याव्यात.

२) मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून मुंबई, म.न.पा. क्षेत्रातील राज्य मंडळांशी संलग्नित शाळांच्या प्रतिपूर्तीची देयके तर विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी मुंबई म.न.पा. क्षेत्रातील अन्य मंडळांशी संलग्नित शाळांच्या प्रतिपूर्तीची देयके अदा करावीत.

३) ऑनलाईन प्रवेश प्रकिया सुरू झाल्यापासून सन २०१७-१८ पर्यंतचे ज्या शाळांचे प्रतिपूर्तीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत अशा शाळांच्या प्रलंबित प्रतिपूर्तीच्या रकमा त्या-त्या वर्षी निश्चित केलेल्या दराप्रमाणे अदा करण्यात याव्यात.

४) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती रु.१७,६७०/- या दराप्रमाणे मंजूर करण्यात यावी.

५) सन २०१८-१९ मधील शाळांच्या प्रतिपूर्ती रकमेपैकी ५० टक्के प्रतिपूर्तीची रक्कम निश्चित दराप्रमाणे शाळांना अदा करण्यात यावी.

६) सन २०१८-१९ मधील ५० टक्के रक्कम अदा करताना खालील बाबींची पडताळणी करण्यात यावी.

- ज्या शाळा शिक्षण हक्क कायद्यातंर्गत २५ टक्के प्रवेश देत आहेत, त्या शाळांनी इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या फीचा तपशील सरल या पोर्टलवर अथवा RTE पोर्टलवर जाहीर केलेली असावी. ज्या शाळांची स्वत:ची वेबसाईट आहे त्यांनी फीचा तपशील त्यावरही जाहीर करावा.
- शाळेने शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत आरटीईची मान्यता प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

- प्रतिपूर्तीसंदर्भात शाळांनी प्रस्ताव दाखल करण्याचे निश्चित वेळापत्रक जिल्हास्तरावरुन तयार करण्यात यावे व त्यानुषंगाने सूचना सर्व संबंधित मुख्याध्यापकांना द्याव्यात.
- ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशातून प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी त्याच शाळेत शिकत असल्याची खात्री सरल व RTE पोर्टल यांचा उपयोग करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावर करावी. या संदर्भातील माहिती शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या लॉगिनमधून तपासावी.
- सोबतच्या प्रपत्र-“अ” मध्ये शाळांनी त्यांचा अहवाल तयार करावा. सदर अहवालांचे एकत्रिकरण जिल्हा स्तरावर करण्यात यावे व शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व जिल्ह्यांचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

(७) सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रतिपूर्तीसंदर्भात स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०८२११३०१२११९२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.08.21 13:18:21 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
६) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा.विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानभवन,मुंबई
८) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
९) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
१०) मा.आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

१४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
१५) संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे (संचालक, विद्या प्राधिकरण यांनी NIC शी संपर्क करून फी जाहीर करण्याकरिता सरल/RTE पोर्टलवर तात्काळ सुविधा उपलब्ध करावी व त्याची माहिती सर्व RTE २५ टक्के अंतर्गत रजिष्टर शाळांना द्यावी.)
१६) एन.आय.सी., पुणे
१७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका/ कटक मंडळे सर्व
१८) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
१९) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)
२०) निवडनस्ती (कार्यासन- एसडी-१)

प्रपत्र-अ

आरटीई अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा शाळानिहाय तपशील

वर्ग		७५ टक्के (सर्वसाधारण) प्रवेशित विद्यार्थी	आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी	प्रत्येक वर्गनिहाय शाळेची फी
इ. १ ली	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. २ री	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ३ री	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ४ थी	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			

	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ५ वी	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ६ वी	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ७ वी	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			
इ. ८ वी	२०१२-१३			
	२०१३-१४			
	२०१४-१५			
	२०१५-१६			
	२०१६-१७			
	२०१७-१८			
	२०१८-१९			
	२०१९-२०			